IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-50

## Special Issue of Department of Economics, Lokmanya Mahavidyalaya, Warora

On

# SELF - RELIANT INDIA (ATMANIRBHAR BHARAT): OPPORTUNITIES AND CHALLENGES

**Chief Editor**

Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**

Dr. Ravindra Bapurao Shende

**Associate Editor**

Dr. Jayshree P. Shastri (Head, Marathi Dept.)
Dr. Shrinivas N. Pilgulwar (Head, Sociology Dept.)
Prof. Tanaji S. Mane (Head, Pol. Sc. Dept.)
Dr. Dipak P. Lonkar (Head, History Dept.)
Prof. Uttam R. Deulkar (Director, Phy. Ed. Dept.)
Ku. Leena N. Puppalwar (Librarian)
Prof. Shrikant N. Puri (Head, English Dept.)

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 69 | भारतीय कृषी क्षेत्राची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल<br>*डॉ. आस्तीक टी. मुंगमोडे* | 352-357 |
| 70 | आत्मनिर्भर भारत :- भारताचे एक पाउल विकासाकडे<br>*प्रा. माया ई. डकाहा* | 358-360 |
| 71 | आत्मनिर्भर भारत अभियान : रोजगार योजना व रोजगार निर्मिती<br>*डॉ. अश्विनी श्री. राऊत* | 361-367 |
| 72 | आत्मनिर्भर भारत आणि शेतीसुधार धोरणे एक आढावा<br>*प्रा. डॉ. मधूकर बाबूराव अनंतकवळस* | 368-375 |
| 73 | आत्मनिर्भर भारत आणि महिला उद्योजकता<br>*प्रा. नंदकिशोर प्रेमचंद सिंगाडे* | 376-383 |
| 74 | भारतीय अर्थव्यवस्थेची आत्मनिर्भर भारत बनण्याच्या दिशेने होणारी वाटचाल<br>*डॉ. मृणालिनी नरेन्द्र तापस* | 384-390 |
| 75 | कोविड-१९ चा विविध क्षेत्रावर आणि मानवी जीवनावर झालेला परिणाम<br>*प्रा. डॉ. गजानन आनंता देवकर* | 391-394 |
| 76 | कोविड-१९ प्रादुर्भावामुळे भारतीय बँकिंग - आव्हाने व उपाययोजना<br>*डॉ. संजय दौ. बेले* | 395-399 |
| 77 | सरकारी योजनेतून दारिद्रय निर्मुलन आणि आत्मनिर्भरतेकडे वाटचाल<br>*प्रा. निलेश अरुण दूर्गे* | 400-406 |
| 78 | आत्मनिर्भर भारत आणि नवीन शैक्षणिक धोरण<br>*प्रा. बाळकृष्ण कारु रामटेके* | 407-412 |


Scanned with OKEN Scanner

# आत्मनिर्भर भारत आणि महिला उद्योजकता

**प्रा. नंदकिशोर प्रेमचंद सिंगाडे**
*सहाय्यक प्राध्यापक, डॉ.एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी, ता. पवनी जि. भंडारा*
*ईमेल :nandkishorsingade3@gmail.com मो.नं. 9422956365*

## प्रस्तावना:

'आत्मनिर्भर भारता' ची कल्पना नवीन, म्हणजे अ-परिचित वाटण्याचे कारण नाही. 'जोडोनिया धन, उत्तम वेव्हारे : उदास विचारे वेच करी' ही समर्थ रामदासांची शिकवण ज्या प्रमाणे आपल्या सामर्थ्याचे, समृद्धीचे अंतिम लक्ष्य विश्वकल्याणाचे आहे हे अधोरेखित करते, तोच आशय आत्मनिर्भरतेचा आहे. यात एक सनातन दृष्टी आहे; निदान संकटकाळात तरी जी नीट अंगीकारायला हवी. ती व्यक्तिगत आणि सामूहिक जबाबदारीची तीव्र जाणीव विकसित करण्याचा प्रयत्न आहे, जगात काय घडते आहे आणि भविष्यात काय घडू शकते त्याबद्दलचे भान निर्माण करण्याचा खटाटोप आहे आणि बदलल्या वैश्विक वास्तविकतेची चाहूलही आहे.'उद्धरावा स्वये आत्मा!' ही सनातन भारतीय दृष्टी आहे. आपल्या उद्धारासाठी आणखी कोणीतरी कोठून तरी येतील ही, 'असेल माझा हरी...' पद्धतीची विचारसरणी नाकारून, ज्याचा तोच किंवा 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' ही शिकवण आपल्या देशात अनेक महापुरुषांनी जनमानसात रुजविण्याचे प्रयत्न केले आहेत. 'आत्मनिर्भर भारताची हाक ही त्याच परंपरेतले पुढचे पाऊल आहे. महत्त्वाचे म्हणजे त्यात बिचकून जाण्यासारखे तर अजिबातच काहीही नाही. सगळ्यांनीच एकमेकांची साथसंगत केली, तरच सर्वांचा विकास शक्य आहे, या मांडणीतही सामाजिक व राष्ट्रीय स्वावलंबनाचा संदेश आहेच. जवळ जवळ हीच भूमिका 'एक भारत - श्रेष्ठ भारत' या मांडणीत आहे. भारताचे ऐक्य ही त्याच्या श्रेष्ठत्वाची पूर्व अट आहे, हे कोणीच नाकारू शकणार नाही. मधल्या काळात सरकारने 'स्टार्ट अप इंडिया', 'स्टँड अप इंडिया सारख्या कार्यक्रमांना पुरेसे पाठबळ देण्याचा प्रयत्न करून उद्योजकता विकासावर भर दिला. रोजगाराचा मुख्य स्रोत आता, पारंपरिक चौकटीतील ठरावीक वेळेच्या व ठरावीक वेतनाच्या नोकऱ्या हा राहू शकणार नाही आणि त्यामुळे उद्योजकतेच्या विकासाकडे वळणे भाग आहे हे ओळखून सुरू केलेली 'मुद्रा' कर्ज योजना हे याच भूमिकेचे फलित होते.

२०१८ मध्ये 'ग्राम स्वराज अभियान' अंतर्गत प्रत्यक्ष खेड्यांमध्ये काही दिवस राहून शेतकरी व ग्रामीण कारागिरांच्या विकास योजना तळापर्यंत पोहोचिवण्याचा प्रयत्न हा या अभियानाचा केंद्रबिंदू होता. शेतमालाला योग्य भाव मिळविण्याच्या संधी शेतकऱ्याला उपलब्ध व्हाव्यात, यासाठी कृषि-उत्पन्न बाजार व्यवस्थेत केलेल्या सुधारणा, अन्न प्रक्रिया उद्योगांवर दिलेला भर आणि कृषि-पर्यटनासारख्या कृषि-आधारित नव उद्यमांना चालना देण्याचे धोरण, ही सर्व ग्राम स्वराजाच्या दिशेने उचललेलीच पावले होती. 'ग्राम-स्वराज्य' ही मूलतः महात्मा गांधींनी मांडलेली संकल्पना,तसेच महिला बचत गटांची निर्मिती आजच्या आत्मनिर्भरतेचेच एक रूप आहे.महिलांना आत्मनिर्भर बनविण्याकरिता व त्यांच्यातील उद्योजकतेला चालना



Scanned with OKEN Scanner